


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार २२ सप्टेंबर २०२४ | अंक २८७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

# भुजबळ राज्यात दंगली घडवणार, माझ्या माणसाला त्रास झाला तर.. मनोज जरांगे पाटील यांचा इशारा

**मराठा आरक्षण संदर्भात सरकारला आणि देवेंद्र फडणवीस यांना निर्णय घ्यावा लागणार आहे, हे भांडण लावण्याचे कुचल धंदे बंद करा. निर्णय घ्यायचं शिका. आम्हाला राजकारणाचं काही देणे घेणे नाही, आमच्या मागण्यांची अंमलबजावणी करा. छगन भुजबळ राज्यात दंगली घडवणार आहे, जर माझ्या माणसाला त्रास झाला तर जालन्याच्या एसपीला सांगतो केसेस नोंदवून घ्या. वडीगोद्रीमधून येणाऱ्या जाणाऱ्या आमच्या माणसाला धोका आहे. जालन्याच्या एसपीला सांगतो माझ्या माणसाला तिथे धोका आहे, आणि कुणी माझ्या मराठ्याला त्रास झाला तर त्यांच्यावर 307 चे गुन्हे दाखल करा, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.**



मनोज जरांगे यांनी गेल्या पाच दिवसांपासून अंतरवली सराटी येथे पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात केली आहे. जरांगे यांच्या समर्थकांना अंतरवलीकडे उपोषणस्थळी जात असताना वडीगोद्री येथे अडवण्यात आलं. त्यावेळी मराठा समन्वयक आण ओबीसी आंदोलकांमध्ये तणाव निर्माण झाला होता. जरांगेंनी थेट मंत्र्यांना फोन फिरवल्याचं समजताच तिथले बॅरिकेटिंग हटवण्यात आलं. या प्रकरणावर मनोज जरांगे यांनी आपली प्रतिक्रिया दिली. छगन भुजबळ यांचा मोठा डाव असून त्यांना दंगली घडवायच्या असल्याचा गंभीर आरोप जरांगेंनी केला. आमचे आणि धनगरांचे वैर नाही आणि ते पिढ्यान पार नाही. लक्ष्मण हाके कोण आलाय भांडण विकत घेणारा, स्वतःला काय जहागीरदार समजतो का? छगन भुजबळ हरामखोर म्हातारपणी गु चिवडायला लागला आहे. म्हातारपनी का डाग लावून घेत आहे. तो हरामखोर भुजबळ इकडे दंगली भडकवून देत आहे. फडणवीसचं एकूण कशाला दंगली लावतो रे. इथे काही झाले तर याला जबाबदार फक्त छगन भुजबळ आणि फडवणीस राहतील, अशा एकेरी शब्दात बोलत मनोज जरांगे यांनी थेट छगन भुजबळ आणि देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधला.

आम्ही बसलो की हे आंदोलनाला बसतात, आम्ही नसल्यावर त्यांनी आंदोलन करावे. यांच्या ढुंगणाला काय साप चावतो का? आम्ही आलो की हे कसे काय येऊन बसतात. कशामुळे मराठ्यांचे आणि धनगरांची भांडणे लावायचे आहे. धनगर आरक्षणाला आमच्यामुळे धक्का लागत नाही, त्यांचा वेगळा प्रवर्ग आहे. आम्ही ऐकून घेतो म्हणजे तुम्ही काय मस्ती लावली का? हे गरीब धनगरांना हे सर्व माहित असल्याचं जरांगे म्हणाले.



## स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल राजुरी नवगण येथे रामचंद्र बहिर यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

**बीड वार्ताहर**

स्वामी विवेकानंद प्री - प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे 17 सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला . ध्वजारोहण नवगण राजुरी येथील सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र नाना बहिर यांच्या हस्ते संपन्न झाले . याप्रसंगी श्री हरिश्चंद्र शेंडगे. प्रा. पंडित शेंडगे तसेच शिक्षक - विद्यार्थी व पालक उपस्थित होते . बातमी सविस्तर : शेतकरी पुत्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित प्री - प्रायमरी इंग्लिश स्कूल राजुरी नवगण येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला . याप्रसंगी निजामाच्या राजवटीतून व रजाकाराच्या कचाट्यातून आपल्या माता - माऊलींनी लढा उभा केला व निजामाचा दक्षिण पाकिस्तान करण्याचा मनसुबा उधळून लावला . स्वामी रामानंद तीर्थ व देशाचे कणखर गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल व येथील जनतेने पाच ते सहा दिवसातच हैदराबाद संस्थान भारतात विलीन केले . तेव्हापासून मराठवाडा मुक्ती दिन साजरा करतो . याप्रसंगी कुमारी अनुजा पवार , अजिंक्य पवार , पृथ्वीराज शेंडगे , रोहन चव्हाण आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केली . तसेच सूत्रसंचालन आदित्य शेंडगे व आभार प्रा.पंडित शेंडगे यांनी व्यक्त केले .या कार्यक्रच्या यशस्वीतेसाठी सौ.सुरेखा जगताप यांनी परिश्रम घेतले तसेच पंचक्रोशीतील नागरिक - विद्यार्थी-पालक - शिक्षक उपस्थित होते .

## मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करुन उपोषण सोडवावे अन्यथा सोमवारी नांदेड बंदची हाक

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : मराठा समाजाला ओबिसीतुन आरक्षण मिळावे या मागणीसाठी १७ सप्टेंबर पासुन मनोज जरांगे पाटील हे सहाव्यांदा उपोषणाला बसले आहेत परंतु शासन त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्याने अखंड मराठा समाज बांधवांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन येत्या दोन दिवसांत मागण्या मान्य करून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण मागे घेण्यास परावृत्त न केल्यास सोमवार दि.२३ सप्टेंबर रोजी नांदेड बंद ची हाक देण्यात आली.

सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी, हैद्राबाद सह सातारा,बॉम्बे गव्हर्नमेंटचे गैझेट लागु करावे,अंतरवाली सराटी सह संपुर्ण महाराष्ट्रातील गुन्हे सरसकट मागे घेण्यात यावे, राज्यभरात कुणबी नोंदणी तपासणी मंदगतीने चालु आहे ती त्वरीत जलद गतीने चालु करावी,ई.ड्ब्लु.एस.सह ई.एस.बी.सी. आणि कुणबी हे तिनही पर्याय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून द्यावेत,१ जुन २००४ चा कायद्यात सुधारणा करुन मराठा व कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय जारी करावा या मागण्या घेऊन मनोज जरांगे पाटील यांनी आत्तापर्यंत पाच वेळा उपोषण केले आहे आता सहाव्यांदा उपोषणाला ते बसले आहेत सरकारने येत्या दोन दिवसांत मागण्या मान्य करून जरांगे पाटील यांचे उपोषण मागे घेण्यास परावृत्त करावे अन्यथा सोमवार दि.२३ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हा कडकडीत बंद करण्यात येईल असे निवेदन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांना अखंड मराठा समाज बांधवांच्या वतीने देण्यात आले यावेळी शेकडो समाज बांधव उपस्थित होते.



## वॉटर शेड ऑर्गनायझेशन पाटोदा विभागून रेशीम उद्योग ट्रेनिंग प्रमाणपत्र वाटप

**बीड प्रतिनिधी** :- महाराष्ट्र राज्य... बीड.. पाटोदा .वॉटर शेड ऑर्गनायझेशन पाटोदा विभाग .. वॉटर ट्रस्ट पाटोदा कडून (तुती) रेशीम उद्योगासाठी संभाजीनगर गांधेली येथील रेशीम प्रशिक्षणासाठी वॉटर ऑर्गनायझेशन ट्रस्ट पाटोदा विभागाकडून रेशीम ट्रेनिंग साठी पाठवलेले शेतकरी शेतकरी पिट्टी काकडहिरा पिंपळवंडी सर्टिफिकेट वितरण करण्यात आले 4 दिवस ट्रेनिंग साठी लागणारा खर्च टोटल वॉटरशेड ऑर्गनायझेशन पाटोदा विभागाने शाश्वत उपजीविका प्रकल्पांतर्गत ॲक्सिस बँकेच्या अर्थसहाय्याने खर्च केला आहे यासाठी टोटल मार्गदर्शन कैलास पन्हाळकर सर राजेंद्र जाधव सर अनिल पालवे सर यांचे अतिशय मोलाचे मार्गदर्शन होते तरीपण सर्व शेतकरी या वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट आणि शाश्वत उपजीविका प्रकल्पाचे धन्यवाद मानले आहे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता....



सर्टिफिकेट वितरण करता वेळी पिट्टी सरपंच डॉ प्रभाकर कवठेकर. उपसरपंच केशवरावजी भोंडवे अक्षय भैय्या कुडके विजय मेंबर कुडके कवठेकर भरत अशोक दादा कुडके तैनूर चिच्या पठाण पिट्टी सर्व शिक्षक आणी ...सर्टिफिकेट धारक सुरेश वादगे



## संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा परळी बंदला उस्फूर्ततेने प्रतिसाद

**दैनिक लोकआरंभ//**

परळी (वार्ताहर) मागच्या 16 सप्टेंबर 2024 रोजी रात्री 12.088 वाजल्यापासून मराठा आरक्षणासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे आंतरवली सराटी जिल्हा जालना येथे आमरण उपोषणाला बसले आहेत त्या उपोषणाची दखल घेतली नसल्यामुळे बीड बंद आव्हान करण्यात आले होते म्हणून आज शनिवार 21 सप्टेंबर 2024 रोजी परळी बंद करण्यात आली होती या बंदला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. मराठा आरक्षणाचा प्रश्न मागच्या अनेक वर्षापासून सरकारने रेंगाळत ठेवला आहे मागच्या एक ते दीड वर्षापासून मनोज जरंगे पाटील हे सातत्याने आमरण उपोषण करत आहेत इतर आंदोलनामार्फत आरक्षणासाठी रस्त्यावर उतरले आहेत पण अजूनही सरकारनं मराठा आरक्षणाची मागणी मान्य केली नाही. मागच्या काही महिन्यापूर्वी नवी मुंबई येथे मुख्यमंत्री यांनी सगेसोयऱ्याचा अध्यादेश लागू करून सरसगट समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करणारा असे लेखी आश्वासन दिल होत पण त्या आश्वासनाची पूर्तता सरकारने केलेली नाही या आश्वासनाच्या पूर्ततेसाठी मनोज जरांगे पाटील हे आंतरवली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत त्या उपोषणाला पाठिंबा म्हणून बीड जिल्हा बंदछाक देण्यात आली होती त्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सरकारने लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण तात्काळ सोडवावे अन्यथा यापेक्षाही उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा याप्रसंगी सकल मराठा समाज परळीच्या वतीने दिला आहे याप्रसंगी तहसीलदार मार्फत मा मुख्यमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे शेकडोच्या संख्येने आज परळी येथे मराठा समाज रस्त्यावर उतरला होता.

# जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ लिंबागणेश कडकडीत बंद :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.२१ ) मराठा आरक्षण संघर्ष योध्दा मनोजजी जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण मिळावे यासाठी अंतरवली सराटी येथे सहाव्यांदा आमरण उपोषण सुरू केले असुन आज उपोषणाच ५ वा दिवस असुन त्यांची प्रकृती खालावली आहे.सरकारकडुन वारंवार मराठा आरक्षण बाबतीत शब्द देऊनही चालढकल करण्यात येत असुन मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ दिलेल्या शब्दाला जागत नाहीत. त्यामुळे सगेसोयरे अधिसुचनेची अंमलबजावणी करा, हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागु करा, अंतरवली सराटीसह राज्यात मराठा आंदोलनाच्या निमित्ताने दाखल गुन्हे मागे घेण्यात यावेत.मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे.मराठा आणि कुणबी एकच असुन अध्यादेश पारित करून कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले असुन त्यांच्या




समर्थनार्थ बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली असुन लिंबागणेश येथील सर्व बांधवांनी दुकाने बंद ठेवून उत्स्फूर्तपणे बंद मध्ये सहभाग घेतला. शिवतीर्थ याठिकाणी एकत्र जमा होत जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ " लढेंगे जितेंगें हम सब जरांगे ","एक मराठा लाख मराठा" जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है" म्हणत जरांगे पाटील यांची प्रतिमा घेऊन घोषणाबाजी केली. यावेळी लिंबागणेश पोलिस चौकीचे अंमलदार संतोष राऊत आणि बाबासाहेब डोंगरे यांच्या मार्फत पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदन देण्यात आले.

कायदा व सुव्यवस्था सांभाळून शांतता राखत बंद पाळण्यात आला.यावेळी डॉ.गणेश ढवळे, बालासाहेब जाधव,कल्याण वाणी, विक्रांत वाणी, अक्षय वाणी,सुरेश ढवळे,अशोकराजे वाणी,अँड. गणेश वाणी, भगवान मोरे,बाळकृष्ण मुळे,अक्षय येडे, संजय सुकाळे,दामु थोरात, विनायक वाणी, संतोष भोसले,भरत वाणी, अमोल जाधव,आण्णा जाधव आदी सहभागी होते. डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर मो.नं.८१८०९२७५७२

# आष्टी येथे ॲड. नरसिंह जाधव यांच्या संपर्क कार्यालयाचे रविवारी खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते उद्धाटन

पाटोदा | प्रतिनिधी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विधी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रमुख व आष्टी विधानसभा मतदार संघातील इच्छुक उमेदवार ॲड. नरसिंह जाधव यांच्या आष्टी येथील संपर्क कार्यालयाचे उद्घाटन रविवारी खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते करण्यात येणार असून, या कार्यक्रमास आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील नागरिकानी उपस्थित राहावे असे आवाहन ॲड. नरसिंह जाधव यांनी केले आहे. या कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉंग्रेसचे



जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदशाध्यक्ष महेबुब शेख, माजी आमदार राजेंद्र जगताप, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष नरेंद्र काळे, प्रदेशाउपध्यक्ष बाळासाहेब मिसाळ, डॉ. विलास सोनवणे, प्रदेश सरचिटणीस प्रा. सुशिलाताई मोराळे, आष्टी तालुका अध्यक्ष अण्णासाहेब चौधरी, प्रदेश सरचिटणीस बापूसाहेब डोके, माजी पंचायत समिती सदस्य गुलाबराव घुमरे, किशोर हंबर्डे, अमोल तरटे, कॉ. महादेव नागरगोजे, शेकाप जिल्हा सरचिटणीस विष्णुपंत घोलप, जिल्हा कार्यकारिणी सदस्य ॲड. सय्यद वहाब, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष डॉ. नदीम शेख, जिल्हा सरचिटणीस गणीभाई, अतुल शिंदे, शिवाजी पारखे, जिल्हा उपाध्यक्ष महादेव साके, दादासाहेब झांजे, गंगा आबा आजबे, जिल्हाध्यक्ष लीगल सेल सतीश गाडे, मुखराम पठाण, ॲड. ज्ञानेश्वर नाईकनवरे आदीसह महविकास आघाडीचे आजी माजी पदधिकारी उपस्थीत राहणार असून या कार्यक्रमास आष्टी मतदार संघातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन ॲड नरसिंह जाधव यांनी केले आहे.



माजलगाव..सिंदफणा पब्लिक स्कूल सीबीएसई हॉलीबॉल क्लस्टर स्पर्धेचे आयोजन केले असताना आयोजका कडुन पत्रकार, परमेश्वर सोळंके, बाळासाहेब आडागळे, विष्णू उगले, अरविंद वाऱ्हळ यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करून यांचा सत्कार करताना प्राचार्य अन्वर सर

## महापालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत फलक, झेंडे व कमानींवर तोडक कारवाई






पनवेल / प्रतिनिधी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांनी दिलेल्या निर्देशानूसार महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील अनधिकृत फलक, झेंडे व कमानींवर तोडक कारवाईस सुरूवात झाली आहे. गेल्या दोन दिवसात या कारवाई दरम्यान एकुण 607 राजकीय बॅनर्स, 142 झेंडे, 24 कमानींवर तोडक कारवाई करण्यात आली आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील कळंबोली, कामोठा, पनवेल, खारघर चारही प्रभागामध्ये उभारण्यात आलेल्या अनधिकृत फलक, झेंडे व कमानींवर कारवाई करण्याबाबत आयुक्तांनी निर्देश दिले होते. त्यानूसार उपायुक्त रविकिरण घोडके व सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या सूचनेनूसार गेल्या दोन दिवसापासून चारही प्रभागामध्ये त्या त्या प्रभागातील प्रभाग अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अनधिकृत फलक, झेंडे व कमानींवर तोडक कारवाई करण्यात येत आहे. या कारवाई दरम्यान चारही प्रभागातील एकुण 607 राजकीय बॅनर, 142 झेंडे, 24 कमानीं काढण्यात आल्या आहेत. पालिका क्षेत्रातील नागरिकांनी महापालिकेची रितसर परवानगी घेऊनच बॅनर्स लावावेत असे आवाहनआयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी केले आहे.

## उसर्लीत सांडपाण्यामुळे रस्त्याची दुर्दशा विश्वास भगत यांनी स्वखर्चातून केली व्यवस्था



पनवेल / प्रतिनिधी उसर्ली खुर्द येथे मोरया गार्डन सोसायटीच्या बाजूला खचलेल्या रस्त्यामुळे ग्रामस्थांची होणारी दुर्दशा बघून माजी सरपंच विश्वास भगत यांनी आज स्वखर्चातून या रस्त्याची डागडुजी केली आणि चालण्यायोग्य सुस्थिती निर्माण केली. परिसरात गटारींची सोय नसल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर येते. पाणी वाहून जाण्यासाठी कुठलीही सोय नसल्याने तुंबलेल्या पाण्यातून वाहने गेल्याने रस्ता खचला होता. या मार्गाने ये - जा करण्यासाठी ग्रामस्थांचे हाल होत होते. याप्रकरणी त्वरित दखल घ्यावी आणि रस्त्याची डागडुजी करावी अशी मागणी उसर्ली ग्रामपंचायतीकडे वारंवार केली होती. ब-याचदा तक्रारी देउनही ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केले. परंतु या रस्त्याने वाहने आणि पायी चालणेही अशक्य झाल्याने आज विश्वास भगत यांनी स्वत:च क्रेन, पाईप आणि इतर साहित्यासह मजूर बोलवून रस्त्याची डागडुजी करवून घेतली. स्वखर्चातून रस्त्याला सुस्थितीत आणल्यामुळे उसर्ली ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

# पनवेल पळस्पे पारपुंड येथे जुलुस शांततेत

इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांचा जन्मदिन त्यांची जयंती दरवर्षी ईद ए मिलाद म्हणून देशभरात मुस्लिम बांधव उत्साहात साजरी करत असतात. मुहम्मद पैगंबर यांच्या सर्वसमावेशक मानवतेचे संदेशांना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी जुलूस मिरवणूक काढण्यात येते. यंदाचे वर्षी ईद ए मिलाद सोमवारी दिनांक.१६ सप्टेंबर ला साजरी करण्यात येते . या वर्षी ईद ए मिलाद चे दिवशी गणेशोत्सवातील नववा दिवस होता. गणेशभक्तांना त्रास होऊ नये म्हणून भाईचारा जपत सामाजिक कार्यात प्रामाणिक पणे कार्य करत असलेली मस्जिद मदरसा अली मोहम्मद शाह नुरी पनवेल पळस्पे ह्या समितीने गणेशोत्सवाचे नंतर बुधवार दि. १८ सप्टेंबर रोजी जुलूस काढण्याचा स्वयंस्फूतीने निर्णय घेतला. बुधवार दिनांक १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ३ वाजता पळस्पे पारपुंड गावात भव्य मिरवणूकिला




सुरवात झाली व सायंकाळी ६ च्या सुमारास पळस्पे मस्जिद ह्या ठिकाणी शांततेत पार पडली. गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक प्रवीण भगत यांनी रॅलीत सहभागी झालेल्या मुस्लिम बांधवांचे कौतुक करत मार्गदर्शन केले. डॉक्टर अनवर नुरी श्री शदाब अबूबक्कर झरिवाला डॉक्टर गोफरान फारुकी डॉक्टर खान ह्यांच्या उपस्तितीत जुलूस मिरवणूकीला सुरवात झाली, पारपुंड मोहल्ला कमिटी कडून जुलूस कमिटीचे स्वागत करण्यात आले. शोहेब शेख आणि सलमान शेख यांच्याकडून रॅलीत सहभागी बांधवांना शरबत वाटप झाले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील यांच्यासह बहुसंख्य मान्यवर तसेच मुस्लिम समाजातील लहान थोर नागरिक सहभागी झाले होते. सायंकाळी उशीरापर्यंत चाललेली मिरवणूक शांततेत पार पडली. मिरवणूकीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी प्रचंड पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# मेघालय राज्याचे महामहीम राज्यपाल यांचा विदर्भ अमरावती धनगर वाड्यांचा दौरा , सामाजिक कार्यकर्त्या वंदना बरडे यांचे सामाजिक कार्य खूप मोठे,

**बीड प्रतिनिधी अंकुश गवळी**

दिनांक १९ सप्टेंबर २०२४ ला मेघालय राज्याचे राज्यपाल महामहीम चंद्रशेखर एच. विजयशंकर हे विदर्भातील अमरावती येथे धनगर वाड्यांच्या दौऱ्यावर आले होते.त्यांचे प्रथम स्वागत नागपूर विमानतळावर करण्यात आले.त्यासाठी पद्मश्री डॉ विकास महात्मे माजी खासदार राज्यसभा, डॉ सुनीता महात्मे, महादेवराव पातोंड सचीव, वंदना विनोद बरडे सामाजिक कार्यकर्त्या व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महीला मंडळ अध्यक्ष सौभाग्य नगर नागपूर, डॉ विनोद बरडे,शरद ऊरकुडे,सागर थोटे,सागर पाल,बेलभक्ते ईत्यादी पदाधिकारी उपस्थित होते व राज्यपालांचे जंग्गी नागपूर विमानतळावर स्वागत करण्यात आले.नंतर अमरावती कलेक्टर आफीसला ढोल ताशे व बंदूकाच्या सलामीत जंग्गी स्वागत करण्यात आले.आणी धनगर वाड्यावर २५ ,३० किलोमीटर अंतरावर असलेल्या जंगलात धनगर वस्तीत जंग्गी स्वागत करण्यात आले.धनगरी न्रुत्य सादर करण्यात आले.महामहीम राज्यपाल यांनी अगदी साध्या भोजनाचा आस्वाद घेतला.सर्व समस्या जाणुन घेतल्या आणि समस्यांवर तोडगा काढण्यासाठी काही कार्यकर्त्यांना मंत्रालयात बैठकीसाठी बोलाविले व समस्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.खुप मनमीळाऊ व्यक्तीमत्व, आदर्श व्यक्तिमत्व, निर्भय व्यक्तीमत्व असल्याचेही जाणवलं. आणी मला त्यांच्यासोबत जेवणाचा



आनंद घेता आला. ततपुर्वी आमचें आदर्श महादेवराव पातोंड साहेब सचीव मला सकाळी ९ म्हणाले की तुमच्या कळे भविष्यात ते जेवण करायला येवू शकतात. पण मी म्हटलं की माझ कुठे एवढं नशीब पण त्याच दिवशी २ वाजता माझ्याघरी तर नाही पण त्यांच्यासोबत जेवणाचा योग आला.धन्य ते ऊद्दगार धन्य ती व्यक्ती,धन्य ते व्यक्तीमत्व आणि धन्य मी पावले.असा अद्तभुत अनुभव आला.आणी त्यांच्या दौऱ्यात मला जाण्याचा योग आला.मेघालय राज्याच्या राज्यपालांच्या ताफ्यात व दौऱ्यात जाण्याचा योग आला.आणी खुप छान अनुभव राहीला.विदर्भात संतोष महात्मे व धनगर बंधू भगिनींनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

# कामोठ्यात ईद-ए-मिलाद मिरवणुकीच्या आयोजनातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश

## सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट ने केले गणेशोत्सवाच्या नंतर मिरवणुकीचे आयोजन

कामोठे प्रतिनिधी.

इस्लाम धर्माचे प्रेषित पैगंबर हज़रत mi मोहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांची जयंती ईद ए मिलाद म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. मोहम्मद पैगंबर यांची सर्व समावेशक आणि धर्मनिरपेक्ष शिकवण समाजात पसरवण्यासाठी जुलूस म्हणजेच मिरवणूक काढण्यात येते. या वर्षी ऐन गणेशोत्सवात ईद ए मिलाद अर्थात मोहम्माद पैगंबर यांची जयंती येत असल्या कारणाने कामोठे येथील सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट ने गणेशोत्सवाच्या नंतर म्हणजेच बुधवार दिनांक १८ सप्टेंबर रोजी जुलूस काढण्याचा अत्यंत प्रशंसनीय निर्णय घेतला.बुधवारी सायंकाळी कामोठे येथे पाच ते सहा हजार बांधव या जुलूस मध्ये सहभागी झाले होते.भाजपा चे अल्पसंख्यांक मोर्चा चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांची या जुलूस मध्ये प्रमुख उपस्थिती होती.

सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट चे प्रमुख संस्थापक इम्रान शेख,सेक्रेटरी सादिक उमर शेख,अध्यक्ष लाबुद्दीन शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्ट चे वतीने ईद ए मिलाद निमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाचे वर्षी सोमवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी अंनत चतुर्दशीचा अदला दिवस होता. त्यामुळे ठिकठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सवात सत्यनारायण पूजेचे आयोजन केले जाते. तसेच दुसऱ्या दिवशीच्या विसर्जन मिरवणुकीचे नियोजन सुरु असते.त्यामुळे अशा धामधुमीच्या वातावरणात जुलूस काढण्यापेक्षा तो गणेशोत्सवाच्या नंतर १८ सप्टेंबर रोजी काढण्याच्या अत्यंत महत्वपूर्ण निर्णय सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट ने घेतला. त्यानुसार बुधवारी सायंकाळी जुलूस चे आयोजन करण्यात आले होते.अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने



आणि शांततेत यावेळी जुलूस संपन्न झाला.

तत्पूर्वी १६ सप्टेंबर रोजी कामोठे येथे सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट ने हजरत मोहम्मद पैगंबर यांची मानवतेची,सर्व समायोजकतेची शिकवण देण्याच्या उद्देशाने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात आले रसूल सजदा नशीन किच्छोचा,शरीफ हजरत मोईन मिया,रझा ॲकेडमी चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष सैय्यद नुरी,मौलाना मुफ्ती अजमल असरी अझारी,शेर-ए-राजस्थान मुफ्ती समीउल्ला कादरी,मौलाना अब्दुल रहमान झियाई आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.या मध्ये सर्वच वक्त्यांनी आपण सगळ्यांनी एकोप्याने राहण्यासाठी प्रेषित मुहंमद पैगंबर यांची शिकवण अंगिकारली पाहिजे असे आवाहन केले तसेच धार्मिक तेढ पसरावणाऱ्यांच्या पासून सावध राहण्याचा सतर्कतेचा इशारा दिला. या देशात आपण विविध धर्मीय बांधव एकोप्याने नांदतो हीच आपल्यातली खरी ताकत असल्याचे प्रमुख वक्त्यांनी सांगितले.

जुलूस मध्ये सहभागी झालेले भाजपा चे अल्पसंख्यांक मोर्चा चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर म्हणाले कि,गणेशोत्सवानंतर जुलूस काढण्याचा निर्णय हा सामाजिक सौदार्ह,जातीय सलोखा न दोन समाजात भाईचारा निर्माण करणारा आहे.तसेच त्यांनी सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट करत असलेल्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली.सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट हि मुस्लिम बांधवांसाठी झटणारी एकमेव धार्मिक संस्था आहे. प्रमुख संस्थापक इम्रान शेख,सेक्रेटरी सादिक उमर शेख,अध्यक्ष लाबुद्दीन शेख,यांच्या माध्यमातून अनेक गरजवंतांना भरघोस सहकार्य केले जाते. मशीद,मदरसे यांना आर्थिक पाठबळ दिले जाते. शैक्षणिक,सामाजिक,धार्मिक कार्यांच्यात समाज बांधवांना मदतीचा हात देण्यासाठी सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट नेहेमीच हिरीरीने पुढाकार घेत असते. सामाजिक उत्कर्ष साधण्यासाठी सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट झटून काम करत असल्याबद्दल सय्यद अकबर यांनी त्यांचे कौतुक केले.

यावेळी काढण्यात आलेल्या जुलूस मध्ये भाजपा चे अल्पसंख्यांक मोर्चा चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट चे प्रमुख संस्थापक इम्रान शेख,अध्यक्ष नबुद्दीन शेख,सेक्रेटरी सादिक उमर शेख,शेहजाद मसुरी,मुमताज भाई,नायाब शेख,रईस भाई,राशिद भाई,असरार भाई,अब्बास चाचा यांच्या सह हजारो समाज बांधव सहभागी झाले होते.

## पनवेलमध्ये सर्वांचे आकर्षण मार्केटचा राजा विराजमान



पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेच्या वतीने गौरा गणेशोत्सवानिमित्त लालबागच्या राजाची प्रतिकृती पनवेलमध्ये विराजमान झाली आहे. या मार्केटच्या राजाचे पूजन आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी गणरायाचे मनोभावे दर्शन घेत जनतेच्या सुख, समृद्धी आणि शांतीचा मार्ग सुलभ व्हावा, अशी प्रार्थना केली.

या गौरा गणेशोत्सवाचे यंदाचे ३२ वे वर्ष असून सामाजिक बांधिलकी जोपासून हा उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात लाखोंच्या उपस्थितीत शांततामय साजरा केला जात असतो. महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचे अध्यक्ष एस.के. नाईक, गौरा गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद नाईक, सचिव दिलीप अनभुले, इतर पदाधिकारी, सदस्य यांच्या नेतृत्वाखाली हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. सर्वांचे आकर्षण असलेल्या या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी झाली होती. लालबागच्या राजाला जेव्हा भक्तांना दर्शन घडत नाही त्यांना पनवेलमध्ये भाजी मार्केट येथे लालबागच्या राजाच्या प्रतिकृतीचे दर्शन होते असे अनभुले यांनी सांगितले यावेळी भाजपा नेते जयंत पगडे यांनीही मार्केटच्या राजाबद्दल स्तुती केली.

## मोठ्या मनाचा दिलदार दादा रमेश गुडेकर पत्रकार केवल महाडीक यांच्यावर केलेला दावा मोठ्या मनाने न्यायालयात मिटवला

पनवेल / प्रतिनिधी तत्कालीन नगरसेवक रमेश गुडेकर यांच्याशी काही अपरिहार्य कारणामुळे पत्रकार केवल महाडीक यांचे वाद झाले होते. वादाविवादानंतर २०१५ मध्ये हा खटला न्यायालयात गेला. तब्बल नऊ वर्षे न्यायालयात खटला चालला. त्यानंतर श्री. रमेश गुडेकर व पत्रकार केवल महाडिक यांनी आपसात समझोता करुन न्यायालयात मोठया मनाने वाद मिटवून घेतला. शिवजयंती निमित्ताने पत्रकार केवल महाडीक यांच्यासह काही कार्यकर्ते त्यावेळी शिवसेना पक्षाचे नगरसेवक असलेले रमेश गुडेकर यांच्याकडे वर्गणी मागण्यासाठी गेले होते. कोणत्याही एका पक्षाचा झेंडा न घेता शहरातील तरुणांनी शिव तरुण प्रतिष्ठान मंडळ स्थापन केले होते. या मंडळाच्या माध्यमातून शिवजयंतीला विविध कार्यक्रम घेण्याचे त्यावेळी नियोजित होते. मात्र याबाबत मतभेद झाल्याने रमेश गुडेकर यांनी शिवीगाळ केली होती. याचा राग आल्याने श्री. महाडीक आणि गुडेकर यांच्यात त्यावेळी शाब्दिक बाचाबाची व सोशल मीडियावर महाडिक यांनी पत्रक काढून बदनामी केली होती,



मात्र दैनंदिन जीवनात राजकारण आणि पत्रकारितेत अनेक कारणांमुळे मतभेद होतात. रमेश गुडेकर आणि केवल महाडीक यांच्यातील वाद सामंजस्याने मिटावे अशी अपेक्षा सर्वांना होती. पत्रकारिता आणि राजकारण याचा समाजजीवनाशी जवळचा संबंध येतो. त्यातच असे मतभेद झाले तर त्यामुळे गैरसमजातून वाद टोकाला जातात त्याचे पर्यावसान शिवीगाळात व मारहाणीत होते. मात्र वेळीच समझोता करुन समजूतदार पणाची भूमिका घेतली तर दोन्ही पक्षकारांमध्ये तडजोडीअंती समझोता होउन त्यांच्या नात्याला पुन्हा नव्याने सुरवात करता येउ शकते. झालेले वाद मिटवून पुन्हा नवीन सुरवात करावी अशी दिलदार भूमिका माजी नगरसेवक रमेश गुडेकर यांनी घेत न्यायालयातच वाद मिटवून घेतला. आणि पत्रकार केवल महाडीक यांच्यावर केलेला दावा मागे घेत नवीन नात्याला सुरवात केल्याचे सांगितले. यासंदर्भात न्यायालयात ॲड. आशिष पनवेलकर यांनी बाजू मांडत विशेष सहकार्य केले व वाद मिटवला.

## पुणे महापालिकेच्या ट्रकला खडड्यात समाधी



**पनवेल / प्रतिनिधी**
पुणे तेथे काय उणे असे म्हटले जात असले तरी काल पुणे महानगरपालिकेच्या ट्रकलाच खडडयात समाधी मिळाल्याची घटना समाधान चौकात घडली आहे. पेव्हिंग ब्लॉकचा रस्ता खचल्याने महानगरपालिकेच्या ट्रकसह दोन दुचाकी या खडडयात गेल्याने पुणे महापालिकेचे उणेदुणे राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे. ट्रॅफिक, खराब रस्ते या सारख्या समस्यांनी पुणे शहर हैराण झालं आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होताना दिसत असतात. अशातच 20 सप्टेंबरला दुपारी पुण्यातील समाधान चौक परीसरात धक्कादायक घटना घडली आहे. पुणे महानगरपालिकेचा ट्रक हा समाधान चौकाच्या सिटी पोस्ट परिसरात एका रस्त्यावर उभा होता. पेव्हिंग ब्लॉकने रस्ता माखला असल्याने रस्ता खचू लागला.

आणि ट्रक खड्ड्यात जाऊ लागला. चालकाच्या ही गोष्ट लक्षात आल्याने त्याने तात्काळ गाडीतून बाहेर उडी मारली. आणि बघता बघता संपूर्ण ट्रक खड्ड्यात गेला.

त्या ट्रकसोबत दोन दुचाकी सुद्धा खड्ड्यात गेल्या आहेत. सदर घटनेची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आली असून अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि अथक परिश्रमानंतर वाहनांना बाहेर काढले.

## ठाणे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास आराखडा तयार होणार ठाणे विकास परिषद-२०२४ च्या माध्यमातून

ठाणे,दि.20(जिमाका) :- विकसित शहर घडविण्यासाठी प्रत्यक्ष अडचणी काय आहेत, यावर अभ्यास करून त्यावरील उपाययोजना शोधून त्या प्रत्यक्षात अंमलात आणणे, हे “ठाणे विकास परिषद-2024” चे उद्दिष्ट आहे. ठाणे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा कल्पकतेने वापर करुन नियोजनबध्द आराखडा केला जात आहे. “मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन” च्या कार्यक्षेत्रात मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मीरा-भाईंदर आणि पनवेल या महानगरपालिका तर अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर, माथेरान, कर्जत, खोपोली, पेण, उरण, अलिबाग आणि पालघर या नगरपरिषदा येतात. नीती आयोगाच्या अहवालानुसार “एम.एम.आर. जागतिक आर्थिक केंद्र” बनविण्याच्या दृष्टीने एमएमआर क्षेत्रांमध्ये सर्वांसाठी घरे (Housing For All),




माहिती व तंत्रज्ञान (Information and Technology), उद्योग 4.0 (Industries 4.0), पर्यावरण (Environment), आणि रोजगार निर्मिती (Employment Generation) या प्रमुख पाच मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या पाच क्षेत्रांना केंद्र बिंदू मानून ठाणे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार “जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे आणि मित्रा” यांच्या संयुक्त विद्यमाने येथील डॉ.काशिनाथ घाणेकर सभागृह येथे शनिवार, दि. 21 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 03.00 वा. या वेळेत “MMR Development Conference-2024” अंतर्गत “ठाणे विकास परिषद-2024” चे आयोजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे.

तरी या विकास परिषदेस पत्रकार, उद्योजक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राज्याच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक, “मित्रा” संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी तसेच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

## विक्रोळी कन्नमवार नगर येथे मोफत आरोग्य शिबीर संपन्न



मुंबई । प्रतिनिधी: विद्या विकास एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन शिक्षण महर्षी दिवंगत प.म.राऊत सर यांच्या स्मरणार्थ डॉ. रश्मी जीवन जाधव, अपोलो हॉस्पिटल आणि प्रो. जीवन जाधव सोशल ट्रस्ट आयोजित विकास हायस्कूल प्रायमरी इंग्लिश स्कूल चे कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी मोफत आरोग्य शिबिर विकास हायस्कूलच्या सभागृहात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन डॉ. अनघा राऊत यांच्या शुभ हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून एसीपी शुभदा चव्हाण उपस्थित होत्या. तसेच डॉ . मेघा परब, श्रीम. विजया राधाकृष्णन विशेष निमंत्रित म्हणून आणि संचालक , शुश्रुषा हॉस्पिटल ,वृत्तपत्र लेखक कृष्णा काजरोळकर उपस्थित होते.यावेळी ३०० जणांनी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी तज्ज्ञ डॉ. सोनाली चव्हाण(डेन्टीश), डॉ. गिरीश सावकरे (ऑर्थो, स्पायन सर्जन), वैभव ऑप्टिशियन आणि डॉ. रश्मी जीवन जाधव (डायटिशियन) यांच्या सहकार्याने रक्तदाब, मधुमेह, ईसीजी, बीएमडी, पीएफटी तसेच डोळ्यांची, दातांची तपासणी आणि आहार विषयक सल्ला देण्यात आला. प्रो. जीवन जाधव यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात संस्थेबद्दल सविस्तर माहिती देऊन मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर डॉ. रश्मी जीवन जाधव यांनी आभार प्रदर्शन करताना विद्या विकास एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. विनय राऊत आणि श्रीम. विजया राधाकृष्णन, मुख्याध्यापिका यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

रविवार २२ सप्टेंबर २०२४



**टी. सी हरवला आहे**

नाव :- जयसिंह गोविंद सातपुते या नावाचा इयत्ता दहावी पास चा टीसी नायगाव ते पाटोदा प्रवास दरम्यान हरवला आहे तरी आपणास आढळल्यास या क्रमांकावर संपर्क साधावा मो.9403336245

# राज्यपाल, मुख्यमंत्र्यांना खा.बजरंग सोनवणेंनी पाठविले पत्र

## मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्याची केली मागणी

बीड/प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, अंतरवाली सराटीत (दि.17) पासून आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे. त्यामुळे राज्यातील कोटी मराठ्यांचा आवाज असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी तातडीने हालचाली कराव्यात, अशा मागणीचे पत्र बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शनिवारी (दि.21)दिले आहे. मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांची खा.बजरंग सोनवणे यांनी अंतरवाली सराटीत जावून भेट घेत, त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करुन राज्यपाल व मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून उपोषण सोडविण्याची मागणी केली.

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील, जीवाची परवा न करता, समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी संविधानिक आणि शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आलेले आहेत. समाजाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय आता माघार नाही, भले जीव गेला तरी चालेल. अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतलेली आहे. मराठा समाजाला त्यांचा शब्द अंतिम असून ते मराठा समाजाच्या काळजाचा विषय आहेत. राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाकडे कदापिही दुर्लक्ष करता कामा नये. संविधानिक मार्गाने रास्त मागणी घेऊन आंदोलन सुरू असेल तर सरकारची आणि प्रशासनाची जबाबदारी आहे की, जातीने या आंदोलनाकडे लक्ष दिले पाहिजे.



आमरण उपोषण सुरू होऊन एक आठवडा होत आला आहे. मात्र अद्यापही सरकारने पावले उचललेली नाहीत. ही बाब चिंतेची आहे. त्यामुळे राज्यपाल महोदय आणि मुख्यमंत्री यांनी जराही विलंब न करता, तातडीने उपोषण सोडविण्यासाठी पावले उचलावीत अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी दिलेल्या पत्रात केली आहे.

### पाटील आमच्या अस्मितेचा विषय

अंतरवाली सराटीत मराठ आरक्षणाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आमरण उपोषणास बसले आहेत. बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे यांनी त्यांची भेट घेऊन विचारपूस केली. यावेळी ते म्हणाले पाटील कोटी मराठी तुमच्या सोबत आहेत. समाजासाठी तुम्ही आज जीवाची परवा न करता उपोषण करत आहात. तुमचा हा लढा आमच्या मुलाबाळांच्या भवितव्यासाठी एक नवी पहाट असणार आहे. त्यामुळे तातडीने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घ्यावी.कारण मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या अस्मितेचा विषय आहे. अशा लोकभावना खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केल्या.



ग्रा. स.पिठ्ठी येथील कचरू काळे यांच्या वडिलांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले होते त्याच्या घरी आज माजी. जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ.शिवाजीराव राऊत यांनी सांत्वन पर भेट दिली यावेळी युवा नेते सुनील काळे, अंगद शेठ भोंडवे,बाळासाहेब खोमणे,दीपक खोमणे,बिरुदेव काळे,खेमगर,पारखे,मदने,अमोल भोंडवे,ओमकार काळे,प्रणय भोंडवे,अविनाश कदम,विजय शेजाळ,युवा पत्रकार नितिन भोंडवे आदी उपस्थित होते..

# अन्न व औषध विभाग ॲक्शन मोडवर सहा दुकानांमधील 8 नमुने तपासणीसाठी, रायगड जिल्हयात कारवाई

पनवेल / प्रतिनिधी सणासुदीचा कालावधी लक्षात घेता खाद्यपदार्थ, मिष्ठान्नाची मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमिवर भेसळयुक्त अन्नाची तपासणी अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे करण्यात येत आहे. शुक्रवारी रायगड जिल्हयात मिठाई व अन्न खाद्यपदार्थांच्या ६ दुकानांमध्ये संशयास्पद वाटणारे ८ नमुने तपासणीसाठी पथकाने ताब्यात घेतले. त्यात पनवेल मधील २ दुकानांमधील ४ नमुनेही घेण्यात आले. खाद्यपदार्थांमध्ये दर्जेदार वस्तू वापराव्यात जणेकरुन नागरिकांचे आरोग्य व्यवस्थित राहील अस आवाहन या पथकाने केले. यावेळी खाद्यपदार्थ विक्रेत्यांसमवेत दोन बैठकाही पथकाने घेतल्या. संपूर्ण रायगड जिल्हयात अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे तपासणी केली जात आहे. अनेकदा खाद्यपदार्थांमध्ये भेसळ असल्याने आरोग्यावर परिणाम होतो. अशा दुकानांवरील मालाची पाहणी करुन नमुने



FDA MAHARASHTRA FOOD AND DRUG ADMINISTRATION

तपासणीसाठी घेतले जातात. त्यात काही आक्षेपार्ह बाब आढळून आली तर कारवाई केली जाते. सणासुदीला वाढती मागणी लक्षात घेता खाद्यपदार्थांमध्ये भेसळ होण्याचे प्रमाण वाढते. अशावेळी कोणत्याही दुकानात जावून खाद्यपदार्थांचे नमुने घेण्याचा अधिकार फक्त अन्न व औषध प्रशासन विभागालाच आहे. दुकानदाराकडे कोणतीही व्यक्ती अशी तपासणी करत असेल तर त्याने ओळखपत्र मागावे. आमचा कोणताही अधिकारी सहज ओळखपत्र दाखवतो मगच कारवाई करतो. आमच्या नावाने कोणी तपासणी करुन धमकी देत असेल किंवा खंडणी मागत असेल तर दुकानदारांनी तत्काळ पोलिसांकडे तक्रार करावी असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे नितीन मोहिते यांनी केले आहे.

# उमेश मोहिते, रचना स्वामी आणि अलीम आजीम यांना अंबाजोगाई मसापचे पुरस्कार जाहीर

## साहित्य संमेलनात होणार वितरण


**अंबाजोगाई (प्रतिनिधी)--** अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या दिवंगत अध्यक्षांच्या नांवे दर दोन वर्षाने होणा-या अंबाजोगाई साहित्य संमेलनात पुरस्कार प्रदान करण्यात येतात. प्राचार्या डॉ. शैला लोहिया, मंदाताई देशमुख व प्राचार्य डॉ. संतोष मुळावकर यांच्या नावे अनुक्रमे लेखिका, कथाकार व शिक्षक लेखकांची निवड केली जाते. यावर्षीच्या पुरस्कारासाठी उमेश मोहीते, एस. रचना आणि अलीम आजीम यांची निवड करण्यात आली आहे.

मसाप आंबाजोगाईच्या दगडू लोमटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत यंदाचे पुरस्कार ठरविण्यात आले असून या पुरस्काराचे वितरण ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

या पुरस्कारांमध्ये प्राचार्या डॉ. शैला लोहिया लेखिका पुरस्कार सौ. रचना स्वामी (आंबाजोगाई-पाथर्डी) यांना मंदा देशमुख कथा लेखक पुरस्कार-उमेश मोहिते (आंबाजोगाई)यांना तर प्राचार्य डॉ. संतोष मुळावकर शिक्षक लेखक पुरस्कार अलीम अजीम शेख (आंबाजोगाई-ठाणे) यांना जाहीर करण्यात आले आहेत. मसाप शाखा अंबाजोगाई घ्या कार्यकारिणी समितीच्या बैठकीत हे पुरस्कार निश्चित करण्यात आले. या बैठकीला सचिव गोरख शेंद्रे, कोषाध्यक्ष शैलजा बरुरे, ११ व्या आंबाजोगाई साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार, मार्गदर्शक अमर हबीब, रेखा देशमुख, तिलोत्तमा पतकराव आदी उपस्थित होते. या पुरस्काराचे वितरण डिसेंबर महिन्यात होणाऱ्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनात केले जाईल,



मंदा देशमुख कथा लेखक पुरस्कार-
• उमेश मोहिते (आंबाजोगाई)



शैला लोहिया लेखिका पुरस्कार-
• रचना (आंबाजोगाई-पाथर्डी)



संतोष मुळावकर शिक्षक लेखक पुरस्का
• अलीम शेख (आंबाजोगाई-ठाण

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com